स.क्रि.के.नं. २४२/१६
निशाणी क्र. १८ लगत

फिर्यादीपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी

मी शपथेवर निवेदन करतो की,

माझे नांवः फरीदा राजामियॉ शेख,

माझे वयः ५२ वर्षे व्यवसायः प्राध्यापिका/नोकरी

राहणारः शिराढोण तालुकाः कळंब

जिल्हाः उस्मानाबाद

सरतपासणी फिर्यादी पक्षातर्फे विधिज्ञ श्री.डी.एन.गौंड यांचेकडुन

१. आरोपी हे के.एन.ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य असल्यामुळे मी त्यांना ओळखते. आरोपी हे मला सन २००९ पासुन १२ वी बोर्डाचे हिंदी विषयाचे पेपर तपासू देत नाहीत. आरोपीने लातूर बोर्डाला पत्र लिहुन कळविले की, मला कोणतेही काम देऊ नये. आरोपीने दिनां ०५.मार्च, २००९ रोजी स्वतःचे लेटरपॅड लातुर बोर्डामध्ये घेऊन गेला. त्यावरती आरोपीने बोर्डाकडुन कॉलेजमधील दुसरे शिक्षक पी.आर.नरवडे यांना माझे काम देऊ का.

२. माझ्या कॉलेजमध्ये मार्च, २००९ मध्ये मी इयत्ता १२ बोर्डाचे लेखी परिक्षेचे पेपर तपासणीकरीता आले होते, म्हणुन मी कॉलेजमध्ये गेले. तेव्हा मला आरोपीने त्याच्या ऑफीसमध्ये बोलावुन घेतले व फोन लावुन दिला. मी आरोपीच्या फोनवरुन समोरच्या व्यक्तीला हॅलो असे बोलल्यानंतर त्याने तो फोन कट केला. आरोपी मला म्हणाले की, तुम्ही हिंदी विषयाचे १२ वी बोर्डाचे पेपर तपासू शकत नाहीत, तुम्ही येथुन जा.

३. त्यानंतर मी दुसरे वर्षी आरोपीकडे मला इयत्ता १२ वी बोर्डाचे लेखी पेपर तपासावयास मिळावे म्हणुन लेखी व तोंडी सांगीतले. परंतु आरोपीने माझ्या विनंतीला पुर्णपणे दुर्लक्षीत केले. त्यानंतर मी सन २०११ पासुन लातूर बोर्डामध्ये मला बोर्डाचे पेपर तपासणीसाठी मिळावेत म्हणुन लेखी पत्र व्यवहार केला. त्यानंतर मी सन २०१४ मध्ये आरोपीकडे मला पेपर तपासण्यास मिळत नसल्यामुळे माझे आर्थीक नुकसान होत आहे म्हणुन अर्ज दिला.

४. त्यानंतर मी दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१५ मध्ये मी बोर्डाला आरोपी हे मला पेपर तपासावयास देत नाहीत तर आपण माझ्याकडे पेपर तपासावयास द्यावेत म्हणुन लेखी विनंती केली. त्यानंतर, बोर्डाचे सचिव यांनी मला त्यांच्या कार्यालयात बोलावुन घेतले. त्यांनी मला सांगीतले की, तुम्हाला पेपर तपासावयास देण्यासाठी कोणतीही हरकत नाही तुम्ही फक्त प्राचार्य/आरोपी यांचे शिफारसपत्र आणा. त्यानंतर मी प्राचार्य/आरोपीकडे मला शिफारसपत्र मिळावे म्हणुन अर्ज दिला. माझ्या अर्जाला आरोपीने उत्तर दिले की, तुम्ही बोर्डामध्ये पेपर मागा, त्यांचे मला पत्र आल्यानंतर मी तुम्हाला शिफारस पत्र देतो. त्यानंतर मी २४ फेब्रुवारी, २०१५ रोजी लातूर बोर्डात जावुन मी आरोपीकडे दिलेले पत्र व आरोपीने मला दिलेले उत्तर दाखल केले. तेव्हा बोर्डाच्या सचिवांनी मला सांगीतले की, प्राचार्य/आरोपी असे उत्तर देऊ शकत नाही मी त्यांना विचारतो. त्यानंतर बोर्डाचे सचिव यांनी आरोपीला त्यासंदर्भात दिनांक ०४ मार्च, २०१५ रोजी पत्र व्यवहार केला.

५. तरीही मला आरोपीने बोर्डाचे पेपर तपासणीसाठी दिले नाहीत, म्हणुन मी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१५ रोजी शिराढोण पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द तक्रार देण्यासाठी गेले. पोलीसांनी माझ्या तक्रार अर्जावर कोणतीही कारवाई न करता आरोपीविरुध्द तुम्ही शैक्षणीक क्षेत्रत कारवाई करा असे दिनांक १९.११.२०१५ रोजी लेखी दिले.

६. त्यानंतर दिनांक ०२.१२.२०१५ रोजी मी आरोपीला कॉलजेच्या गेटवरती तुम्ही मला १२वी बोर्डाचे लेखी परिक्षेचे पेपर तपासण्यासाठी शिफारस पत्र द्या अथवा तपासणीस यांच्या यादीमध्ये माझे नाव तरी समाविष्ठ करा. तेव्हा आरोपी मला म्हणाले की, मी तुझी खुप बदनामी केली आहे, बोर्ड काही तुला पेपर तपासणीसाठी देणार नाही. तसेच माझा तुला शिफारस पत्र देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच यापुढे तु मला कधीही शिफारस पत्र मागू नको असे म्हणाले. तेव्हा मी आरोपीला जोपर्यंत माझ कर्तव्य आहे तो पर्यंत तुमच्याकडे शिफारसपत्र मागणार असे सांगीतले. तेव्हा आरोपीने रागाला येऊन मला शिवी देवुन मारण्यासाठी हात उगारला. तेव्हा तेथे साक्षीदार मजहर हा होता. मजहर याने मला हाताने ओढुन दूर नेले. तेव्हा आरोपी मला म्हणाला की, तु जर का ही घटना कोणाला

सांगीतली तर मी तुला जिवे खल्लास करीन.

७. त्यानंतर मी घरी गेले. घरुन पुन्हा मी फिर्याद देण्यासाठी शिराढोण पेालीस ठाण्यात गेले. पोलीसांनी मला कोर्टामध्ये जाण्याचा सल्ला दिला. मी अभिलेखाकडे आरोपी व बोर्डाकडे केलेला पत्र व्यवहाराच्या प्रती दाखल केल्या आहेत. तसेच आरोपीने मला जो पत्र व्यवहार केला तो मी अभिलेखात दाखल केला आहे.

८. निशाणी क्र. ३ सोबत दाखल केलेल्या पत्रव्यवहारातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र. २४/१ ते २४/१३ देण्यात येतो.

उलट तपासणी आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.व्ही.के.माने यांचेकडुन

९. माझ्याकडे सन २००८ च्या पुर्वी पाच ते सहा वर्षापासुन ते २००८ पावेतो इयत्ता १२ वी बोर्डाचे पेपर तपासणीचे काम होते. इयत्ता १२ वी बोर्डाच्या लेखी परिक्षेच्या उत्तरपत्रीका तपासणीला आल्यानंतर त्याची गुणपत्रीका व उत्तरपत्रीका याच्याशी प्राचार्य यांचा काहीही संबंध येत नाही. इयत्ता १२वी बोर्डाच्या तोंडी परिक्षेचे गुणपत्रीकेवर प्राचार्यची सही घ्यावी लागते. हे म्हणणे खरे नाही की, सन २००८–०९ च्या १२ वी बोर्डाच्या तोंडी परिक्षेच्या गुणपत्रीका मी माझ्या घरीच ठेवल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, सन २००९ मध्ये १२ वी बोर्डाच्या हिंदी विषयाच्या तोंडी परिक्षेच्या गुणपत्रीका आरोपीच्या कार्यालयात जमा न करता परस्पर लातूर बोर्डाकडे पाठविल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आरोपीने त्या गुणपत्रीका कार्यालयात जमा करण्यासाठी माझ्याकडे शिपाई पाठवला. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, आरोपी हा तोंडी परिक्षेला गैरहजर असलेल्या विद्याथ्र्याला मार्क देत होते व हजर असणा–या विद्याथ्र्यांचे मार्क जाहीर करत होते.

१०. हे म्हणणेखरे आहे की, त्यामुळे सन २००९ मध्ये लातूर बोर्डाने आरोपीला पत्रव्यवहार करुन मी परस्पर त्यांच्याकडे गुणपत्रीका पाठवल्याची बाब गंभीर असल्याचे कळविले. हे म्हणणे खरे नाही की, त्यासंदर्भात खुलासा देण्यासाठी बोर्डाने मला बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यावर बोर्डाने कोणतेही प्रश्नपत्रीका तपासण्यास देऊ नये म्हणुन निर्बंध घातले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १५.११.२०१५ रोजी मी

आरोपीच्या कार्यालयात जाऊन त्याने बोर्डाकडे माझी शिफारस करावी अथवा मला पेपर तपासणीस द्यावे म्हणुन गोंधळ घातला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यादिवशी आरोपीच्या कार्यालयातील काच देखील फोडले होते. साक्षीदार नंतर सांगते की, ती घटना नोव्हेंबर २०१५ मधील नसुन मार्च–२०१५ मधील होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या घटनेसंदर्भात आरोपीने शिराढोण पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

११. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला बोर्डाने मला कोणतीही उत्तरपत्रीका तपासण्यास देऊ नये म्हणुन कळविले होते. मी आरोपीविरुध्द बोर्डाकडे दरवर्षी तक्रारी करते.

१२. हे म्हणणे खरे नाही की, माझा व आरोपीचा पुर्वी घटस्फोट झाला आहे. आरोपी माझे पती आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीविरुध्द या प्रकरणाव्यतिरिक्त दोन प्रकरणे दाखल केली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, या घटनेसंदर्भात आरोपीने माझे नुकसान केले म्हणुन नुकसन भरपाइ मिळावी म्हणुन मी त्याच्याविरुध्द दिवाणी दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी या आरोपीविरोधात मुलाच्या वतीने वाढीव पोटगी मिळवी म्हणुन दोन प्रकरणे दाखल केली आहेत.

१३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०२.१२.२०१५ रोजीच्या घटनेवेळी आरोपी व माझ्या व्यतिरिक्त कॉलेजमध्ये कोणीही नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द जाणीवपुर्वक खोटया केसेस करुन त्याला त्रास देत आहे. हे मला माहीत नाही की, आरोपीने माझ्याविरुध्द कुठे तक्रार केली आहे अगर कसे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादमध्ये नमुद केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणेखरे नाही की, आरोपीला त्रास देण्यासाठी मी सदरची खोटी फिर्याद दाखल केली आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

दिनांकः १५.०२.२०१९.

(एम्.डी.ठोंबरे)
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग,
(कोर्ट नं. २) कळंब.